प्रपत्र : १ - अ

# पहिली खबर

238 (फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये)

१. जिल्हा : नंदुरबार पोलीस ठाणे : शहर पो.स्टे वर्ष : २०20

पहिली खबर क्र. : 1405/2020 तारीख : 03/11/2020

२. अ) अधिनियम भ्र.प्र. कायदा - कलमे

ब) अधिनियम 1988 सुधारित - 2018 कलमे 7 प्रमाणे.

क) अधिनियम ........ कलमे ........

ड) अधिनियम ........ कलमे ........

३. अ) अपराधाची घटनेचा वार : सोमवार दि. 02/11/2020 पासून दि. पर्यंत

वेळेचा अवधी 18:38 वा. पासून वा. पर्यंत.

ब) पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याची तारीख 03/11/2020 वेळ 02:31

क) सर्वसाधारण रोजनिशीचा संदर्भ क्र. 05 वेळ 02:31

४. माहितीचा प्रकार लेखी/तोंडी

५. घटनेचे ठिकाण नंदुरबार शहरात गाझीनगर भागात दारुशा शिफा क्लिनिक येथे.

अ) पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर 1 कि.मी. गस्तक्षेत्र क्र.

ब) पत्ता ........

क) या पोलीस ठाण्याच्या हद्दीच्या बाहेर असल्यास, त्या पोलीस ठाण्याचे नांव

पोलीस ठाणे ........ जिल्हा ........

६. तक्रारदार/खबरी :

अ) नांव : उखा भरवा माळी

ब) पित्याचे/पतीचे नांव : भरवा माळी

क) जन्म तारीख/वर्ष : 55 वर्ष राष्ट्रीयत्व : भारतीय

ड) पारपत्र क्र. : ........ दिल्याची तारीख : ........ दिल्याचे ठिकाण : ........

इ) व्यवसाय : नोकरी.

ई) पत्ता : मु.पो. होळतर्फे हवेली गुरुकुल नगर-1 प्लॉट नं. 04 ब-1 ता.जि. नंदुरबार

प्रपत्र : १ - ब

७. माहित असलेल्या/संशयित/माहित नसलेल्या आरोपीचा संपूर्ण तपशील (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.)

डॉ. मोसम अली खान, वय 75 वर्ष
व्यवसाय - सेवानिवृत्त वैद्यकिय अधिकारी नंदुरबार S.T. डेपो (कंत्राटी)
रा. गाझीनगर नंदुरबार ता.जि. नंदुरबार.

संशयितांची शारीरीक ठेवण, व्यंग आणि इतर तपशिल :-

| लिंग १ | जन्मतारीख/वर्ष २ | बांधा ३ | उंची (सेंमी.मध्ये) ४ | वर्ण ५ | ओळख ६ | व्यंग/वैशिष्ट्ये ७ | दात ८ | केस ९ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |

| डोळे १० | सवयी ११ | पोशाखाच्या सवयी १२ | भाषा/बोली भाषा १३ | भाजल्याची खुण १४ | कोड १५ | तीळ १६ | व्रण १७ | गोंदण १८ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |

जर तक्रारदार/खबरीने संशयीत बद्दल वरील १ किंवा अधिक रकान्यातील माहिती दिली तरच भरावे. तपास अधिकाऱ्याने प्राथमिक पातळीवर तपास करण्यासाठी वरील माहिती उपयोगात आणावी. या अनुषंगाने तयार झालेल्या माहितीचा उपयोग संशयीतांचा इतर गुन्ह्यातील सहभाग स्पष्ट करेल. वरील रकान्यातील संपूर्ण माहिती ज्यावेळी संशयीतास अटक करण्यात येईल त्यावेळी पुन:श्च तयार करावी.

८. तक्रारदाराने/खबऱ्याने तक्रार करण्यातील विलंबाची कारणे :

९. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.)

भारतीय चलनी नोटा 500 रु दराच्या 8 नोटा. एकूण 4000/- रु.

प्रपत्र : १ - क

१०. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य : ........

११. मरणान्वेषण अहवाल/यु.डी. प्रकरण क्र. जर असल्यास : ........

१२. पहिल्या खबरीतील हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावेत.)

यातील तक्रारदार हे हृदय विकाराने असल्याने त्यांना यापुर्वी पॅरालिसिस आला आहे त्याची ॲन्जीओग्राफी व ॲन्जिओप्लास्टी झालेली आहे. त्यांना एकुण 3 लाखच्या आसपास खर्च झालेला आहे. त्यांनी उपचाराचे बिल म.रा.ए.टी. महामंडळाकडुन मंजुर होण्यासाठी फाईल तयार करुन नंदुरबार एस.टी. महामंडळाद्वारे नियुक्त केलेले गाझीनगर, नंदुरबार येथिल दवाखाना असलेले डॉ. मोसम अली खान यांच्याकडे मे 2020 मध्ये पडताळणी साठी सादर केले नंतर ती फाईल विभागीय कार्या. धुळे येथुन त्रुटीवर परत आली त्या त्रुटीची पुर्तता करुन फाईल पुन्हा लोकसेवक डॉ. खान यांच्याकडे सप्टेंबर महिन्यात दिली परंतु लाच दिल्याशिवाय ते फाईलची पुर्तता करत नव्हते त्यामुळे तक्रारदार यांनी ॲन्टी. क. ब्युरो. नंदुरबार कार्या. तक्रार दिली असता दि. 24/10/2020 रोजी पडताळणी केली असता लोकसेवक खान यांनी पंचासमक्ष 4000/- रु लाचेची मागणी करुन ती लाच दि. 02/11/2020 रोजी त्यांच्या गाझीनगर येथे दवाखान्यात पंचा समक्ष स्विकारली म्हणुन गुन्हा.

१३. केलेली कार्यवाही : बाब क्र. २ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये अपराध घडल्याचे वरील अहवालावरून दिसून आल्यामुळे प्रकरण नोंदवले आणि तपासाचे काम हाती घेतले.

अन्वेषण अधिकारी जयपाल ही. अहिरराव पदनाम पो.नि.

यांना तपास काम हाती घेण्याचा निर्देश दिला/तपास करण्याचे नाकारले/अधिकारितेच्या मुद्यास ........ पोलीस ठाण्याकडे हस्तांतरीत केले.

पहिली खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला/खबरील प्रत मोफत दिली. :

अ) चार्ज सिट/फायनल नंबर : ........ कोर्टाचा नंबर : ........

१४. कोर्टाचा निकाल : ........

व्हिलेज क्राईम नोट बुक क्र. : ........

U.B. Mali

१५. तक्रारदाराची सही/अंगठा

[signature]

पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याची सही

नांव गणपत सुभाष बिडे

पदनाम स.पो.नि. क्रमांक नंदुरबार शहर पो.स्टे

१६. कोर्टात पाठविल्याची तारीख व वेळ : 3/11/2020

Scanned with CamScanner

मी उखा लखा माळी वय ५५ वर्ष व्यवसाय – नोकरी, (चालक) एस.टी. महामंडळ रा. मु.पो.होळतर्फे हवेली गुरूकुलनगर १ प्लॉट नं.४ व १ ता. जि. नंदुरबार मोबा.८००७९७४७७६ समक्ष हजर राहून फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणी कुटूंबासह राहत असून नोकरी करून उदरनिर्वाह करतो. मी दि.१७/०१/२०२० रोजी नेहमीप्रमाणे नंदुरबार एस.टी.डेपो येथे ऑन डयुटी असताना मला सकाळी ०७:०० वाजेच्या सुमारास अटॅक आल्याने मला नंदुरबार येथील शिंदे हॉस्पिटल येथे उपचाराकामी ॲडमीट केले होते. दि. २२/०१/२०२० रोजी मी ग्लोबल हॉस्पिटल, पुणे येथे अॅन्जीओग्राफी केली त्याच दिवशी मला पुन्हा अटॅक आल्याने पुना हॉस्पिटल येथे ॲडमिट होवून दि. २४/०१/२०२० रोजी माझेवर अॅन्जीप्लॉस्टी झाली होती. त्याचे बील रूपये अंदाजे २,००,०००/–इतके झाले होते. सर्व खर्च मिळून एकूण अंदाजे ३,००,०००/– एवढा खर्च आला आहे. मी सदर उपचाराच्या खर्चाचे बील महामंडळाकडून मंजुर होण्याकरीता फाईल तयार करून नंदुरबार कार्यालयातुन एस.टी.महामंडळाद्वारे नियुक्त केलेला गाझीनगर येथील राहणारा डॉ.एम. ए.खान यांच्याकडे मे महिन्यात पडताळणीकरीता मेडीकल बिल सादर केले असता त्यांनी सदर फाईल तपासुन मला परत केली होती. त्यानंतर मी ती मेडिकल फाईल धुळे येथील विभागीय कार्यालयात सादर केली असता तेथील परिक्षकाने त्यात त्रुटया काढुन दुरूस्तीकरीता पुन्हा मला परत केली. त्या त्रुटयांची पुर्तता करून फाईल क्लिअर करण्याकरीता पुन्हा मला परत केली. त्या त्रुटयांची पुर्तता करण्याकरीता मी पुन्हा सदर मेडिकल फाईल सप्टेंबर महिन्यात डॉ. खान यांचेकडे दिली. त्यावेळी त्यांनी मला त्रुटया पुर्तता करून फाईल क्लिअर करण्याकरीता माझेकडून पैशांची मागणी करून पैसे दिल्याशिवाय काम होणार नाही असे सांगितले होते. मी डॉ.खान यांना भेटण्यासाठी जाणार आहे. डॉ.खान यांना आमचे कार्यालयाकडुन मानधन मिळत असल्यामुळे ते मागत असलेले पैसे हि कोणतीही शासकीय फी अगर शासकीय देणे नसुन ते मागत असलेली रक्कम ही लाचच आहे अशी माझी खात्री झाली आहे. त्याना लाच देण्याची माझी ईच्छा नाही. माझे व डॉ.खान यांचेशी कोणतेही पुर्ववैमनस्य किंवा कोणताही आर्थिक देवाणघेवाणीचा उधार उसनवारीचा व्यवहार नाही अशी लेखी तक्रार मी दि. २९/१०/२०२० रोजी ला.प्र.वि.कार्यालयात पंचांसमक्ष दिली होती. त्यानंतर दोन्ही पंचांना मी लिहुन दिलेली लेखी तक्रार वाचण्यास दिली. त्यावेळी मी सांगितलेली तोंडी हकीकत व लेखी तक्रार सारखी असल्याने सदर तक्रारीवर दोन्ही पंच व पोनि/ अहिरराव अशांनी सहया केल्या होत्या. त्यानंतर पोनि/अहिरराव साहेबांनी सांगितले की, लाचेचा सापळा कार्यवाहीमध्ये सुरूवातीला पडताळणी करणे आवश्यक असल्याने त्यांनी सोनी कंपनीचा एक डिजीटल व्हाईस रेकॉर्डर व सॅनडिस्क मायक्रो एस.डी.–८ जी.बी.चे एक सीलबंद मेमरीकार्ड बाहेर काढून दोन्ही पंच व माझेसमक्ष हजर केले. सदर डिजीटल व्हाईस रेकॉर्डर कसे हाताळण्यात येते याची सविस्तर माहिती पोनि/अहिरराव यांनी मला व दोन्ही पंचांना दिली. त्यासोबतच डिजीटल व्हाईस रेकॉर्डर हाताळणीचे प्रात्यक्षिक करून दाखविले. त्यानंतर त्यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरू करून त्यामध्ये पूर्वीचे कसलेही रेकॉर्डीग नसल्याची मी व दोन्ही पंचांनी खात्री केली. त्यानंतर पोनि/अहिरराव यांनी वरील मेमरीकार्ड डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये टाकून मेमरीकार्डमध्ये देखील पूर्वीचे कोणतेही संभाषण ध्वनीमुद्रीत नसल्याची दोन्ही पंचांची व माझी खात्री करून दिली. त्यानंतर पोनि/अहिरराव यांनी मला व पंच नं.१ बोरसे यांना पडताळणी पंचनामाकामी योग्य त्या सुचना देवुन त्यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर माझे शर्टचे आतील बनियानला लावून ते सुरु केले. ती वेळ १८:३५ वाजेची होती. त्यानंतर मला डॉ.खान यांची भेट घेण्यासाठी पंच नं.१ यांचेसह माझ्या ताब्यातील मोटार सायकलीने नंदुरबार शहरातील गाझीनगर येथील डॉ. खान यांचे दवाखान्यात गेलो असता त्याठिकाणी डॉ.खान हे भेटले. त्यावेळी आमचेत मेडिकल बिलाच्या कामाबाबत चर्चा झाली. चर्चेदरम्यान डॉ.खान यांनी माझे मेडिकल बिलाच्या त्रुटयांची पुर्तता करून फाईल क्लिअर करण्याकरीता माझेकडुन त्याने ४००० रूपयेची मागणी केली होती. मी दि. ०२/११/२०२० रोजी सोमवारच्या दिवशी देईन असे डॉ.खान यांना सांगितले होते. त्यानंतर मी पंच नं. १ श्री. बोरसे यांचेसोबत सदर दवाखाना येथून माझे ताब्यातील मोटारसायकलीने ला.प्र.वि.कार्यालय नंदुरबार येथे परत आलो. त्यावेळी मला लावलेले डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर १९.०८ वाजता बंद करून पोनि/अहिरराव यांनी त्यांचे ताब्यात घेतले. व सदर डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर त्यांचेकडेस असलेल्या लॅपटॉपवर लावुन माझेत व डॉ.खान यांच्यात झालेले संभाषण दोन्ही पंचांसमक्ष ऐकले. त्यात डॉ.खान यांनी माझेकडुन ४०००/–रूपये लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाल्याने त्याबाबत पोनि/अहिरराव यांनी नंदुरबार येथील ला.प्र.वि.कार्यालयात सविस्तर लाचेची पडताळणी पंचनामा केला आहे. त्यानंतर तक्रारदार श्री. माळी यांना डयुटी असल्याने तसेच पैशांची जमवा जमव करण्यासाठी वेळ लागत असल्याने आपण आम्हा दोन्ही पंचांना व तक्रारदार श्री. माळी यांना गोपनियता ठेवणेबाबत सुचना देवुन सदरची यशस्वी सापळा कारवाई ही दिनांक ०२/११/२०२० रोजी करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. तसे समजपत्र व सुचना दिले होते. त्यानंतर आपण मला दिनांक २९/१०/२०२० रोजी दिलेल्या सुचनेप्रमाणे मी आज दिनांक ०२/११/२०२० रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार येथे १६.०० वाजता हजर झालो त्यावेळी कार्यालयात पोलीस उपअधीक्षक श्री.जाधव, पोनि/अहिराव, व त्यांचा स्टाफ व दोन्ही पंच असे हजर होते त्यावेळी आपण सर्वानुमते दोन्ही पंचांसमक्ष यशस्वी सापळा कारवाई करण्याचे ठरविले होते. त्यावेळी पोनि/अहिरराव यांचे सुचनेवरून पोहेकॉ/गुमाने यांनी दोन्ही पंचांसमक्ष एक सिलबंद खाकी पाकिट दाखविले. त्यावर अॅन्थ्रॉसिन पावडर असे लेबल होते. त्या पावडर बाबत पोहेकॉ/गुमाने यांनी माहिती दिली की, सदर पावडर नोटांना किंवा कपडयांना लावली असता ती साध्या उजेडात दिसुन येत नाही. सदर पावडर पाहण्यासाठी अंधार करून त्यावर अल्ट्राव्हायलेट दिव्याचा/टॉर्चचा प्रकाश टाकल्यावर फिक्कट हिरवट रंगाची चकाकी दिसुन येते. बाबत अॅन्थ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायलेट दिवा यांचे गुणधर्म समजावुन सांगितले होते. त्यानुसार दोन्ही पंचांना व मला सापळापूर्व पंचनाम्यात नमुद सूचना पुन्हा देवून मी माझे पगाराचे बचतीतुन आणलेले ४०००/–रूपये त्यात ५००/–रुपये दराच्या आठ चलनी नोटा पोनि/अहिरराव यांचेसमक्ष हजर केल्याने त्यांचे सुचनेनुसार सदर नोटांना पोहेकॉ/गुमाने यांनी अॅन्थ्रॉसिन पावडर लावली त्याबाबत सविस्तर सापळापुर्व पंचनामा लाप्रवि कार्यालयात करण्यात आला आहे. त्यानंतर पोनि/अहिरराव यांनी दिलेल्या सुचनानुसार पोहेकॉ/गुमाने यांनी अ.पा.पावडर लावलेल्या नोटांची एकेरी घडी करून त्या नोटा माझे शर्टाचे पुढील बाजुस असलेल्या डावेकडील खिशात ठेवल्या. त्यावेळी पोनि/अहिरराव यांनी त्यांचेकडील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये दोन्ही पंचांसमक्ष सिलबंद नवीन ८ जी.बी.चे कोरे मेमरी कार्ड टाकून व्हॉईस रेकॉर्डर माझे बनियनला आतील बाजूने लावून सदरचे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर सुरु केले. ती वेळ १८.२५ वाजेची होती. त्यानंतर यशस्वी सापळा कारवाईसाठी लाप्रवि नंदुरबार कार्यालय येथुन रवाना होवुन डॉ.खान यांचे दवाखाना येथे आलो असता त्यावेळी सापळा पथकातील अधिकारी व कर्मचारी असे डॉ. खान यांचे दवाखान्याचे आजुबाजुस दबा धरून थांबले होते. त्यावेळी मी डॉ.खान यांना भेटुन कामाबाबत चर्चा केली त्यावेळी त्यांनी मागणी केलेले ४०००/– रूपये लाचेची रक्कम मी माझे शर्टचे खिशातुन काढुन त्यांचेसमोर धरले असता ते त्यांनी उजवे हाताने स्विकारून त्यांचे टेबलावरील कागदावर ठेवले त्यावेळी मी सापळा पथकातील अधिकारी/कर्मचारी यांना ठरलेला पुर्वनियोजित इशारा केला असता आजुबाजुस असलेल्या सापळा पथकातील अधिकारी/कर्मचारी असे सक्रीय होवुन डॉ. खान यांचे दवाखान्यात आले त्यावेळी आपण पंच नंबर १ श्री. बोरसे यांना विचारले की, तक्रारदार श्री. माळी यांचे कडुन लाचेची रक्कम कोणी स्विकारली बाबत विचारले असता पंच नंबर १ श्री. बोरसे यांनी सांगितले की, समोर खुर्चीवर बसलेले डॉ. खान यांनी स्विकारुन त्यांचे टेबलावरील कागदावर ठेवले आहेत. सदर लाचेची रक्कम आपण पंच नं. २ श्री. पाटील यांचे मार्फतीने हस्तगत केली होती. त्यानंतर आपण डॉ. खान यांना शिरिष जाधव साहेब पोलीस उपअधीक्षक, जयपाल अहिरराव पोलीस निरीक्षक व स्टाफ अॅन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार अशांनी ओळख देवून ताब्यात घेतले. त्यावेळी पोनि/अहिरराव यांनी माझे शर्टाचे आतील बनियनला लावलेला डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर काढुन ते १८.३८ वाजता बंद करुन त्यांचे स्वत:चे ताब्यात ठेवले होते. त्यानंतर पोनि/अहिरराव व सापळा पथकातील अधिकारी व कर्मचारी अशांनी डॉ.खान यांना ताब्यात घेवुन लाप्रवि नंदुरबार कार्यालय येथे आणले व पुढील कारवाई केली. तसा पोनि/अहिरराव यांनी सविस्तर यशस्वी सापळा पंचनामा १६:०० ते २३:४५ वाजेपावेतोचा करण्यात आलेला आहे. दि. ०२/११/२०२० रोजी मोझम अली खान वय ७५ वर्ष व्यवसाय – एस. टी. डेपो नंदुरबार आगार येथे सेवाभावी वैद्यकीय अधिकारी, (कत्राटी) रा. नंदुरबार गाझीनगर मधील राहणारे फहीम काजी यांचे घरात याने माझेकडुन माझे मेडिकल बिलाच्या त्रुटयांची पुर्तता करण्यासाठी ४००० रूपयेची लाचेची मागणी करून सदर लाचेची रक्कम दि. ०२/११/२०२० रोजी पंच साक्षीदारासमक्ष रंगेहात पकडण्यात आले आहे. तरी डॉ. एम. ए. खान यांचेविरुध्द माझी कायदेशिर फिर्याद आहे.

Scanned with CamScanner